Shri. Mahesh Kakade,
Controller of
Examinations

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**- 416 004, MAHARASHTRA
☎ PHONE : EPABX- 2609000 (10 Lines), 2693643 (9 Lines), 2693730 (9 Lines)
✉ GRAM : UNISHIVAJI ✆ TELEX : 0195 559 SUK IN
☎ PHONE : (Direct) 2693176, 2609067 FAX :(Direct) 0091-0231-2690655
Website : www.unishivaji.ac.in E-mail : coe@unishivaji.ac.in

Ref. No. : SU/EXAM/ON DYR/14-15/ DATE : 29-Mar-15 7:31:41 PM

**ऑड नंबर परिपत्रक-२**

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक/वरिष्ठ पर्यविक्षक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त शिक्षणसंस्था

विषय :- ३० मार्च, २०१५ रोजी सुरू होणा-या लेखी परीक्षांचे बी.ए. सेम-१ व ६ व बी.कॉम सेम-१ व ६ साठी ऑड नंबर तसेच यापैकी ज्या विद्यार्थ्यांचा निकाल यापूर्वी कळविण्यात आलेल्या तांत्रिक अडचणींमुळे जाहीर झालेला नाही त्यांचे गुण दर्शविण्यात येत असल्याबाबत...(सेम-६ बी.ए. व बी.कॉम. साठी ऑड नंबरची आजची दुसरी यादी सोबत आह)

महोदय/महोदया,

- वरील विषयासंदर्भात आदेशान्वये कळविण्यात येते की, दिनांक ३० मार्च २०१५ पासून सुरू होणा-या बी. ए. सेम-१ व ६ व बी.कॉम सेम- १ व ६ परीक्षांसाठी मॅन्युअल फॉर्मचा महाविद्यालयांनी जसा सॉफ्ट कॉपीतील डेटा डियुडिसी सेलकडे जमा केलेला होता त्याच डेटावर डियुडिसी ऑड नंबर नमुद करून ती यादी संकेतस्थळावर ठेवण्यात आली आहे. महाविद्यालयांनी त्याच यादीतील नंबर विद्यार्थ्यांना द्यावा. अन्य कोणताही नंबर महाविद्यालयांनी परस्पर देऊ नये.

  दरम्यान सदर यादीत दर्शविलेल्या विद्यार्थ्यांचे बैठक क्रमांक सिस्टिममधून जनरेट झाले आहेत किंवा काय याची http://suk.digitaluniversity.ac/ मध्ये खात्री करावी. जर सिस्टिममधून बैठक क्रमांक जनरेट झाला असेल तर त्याच क्रमांकाने सर्व सेमेस्टरच्या परीक्षेस बसावे. ऑड नंबरच्या यादीत अशा विद्यार्थ्यांचा ऑड नंबर कळविण्यात आला असला तरी तो देऊ नये. महाविद्यालयांनी अचानक आलेल्या विद्यार्थ्यांसाठी परस्पर नंबर देऊ नयेत कारण निकाल जाहीर करताना अडचणी येतात. अपरिहार्य कारणास्तव अशा प्रकारचे ऑड नंबर देणे आवश्यक आहेत अशी खात्री पटल्यास खालील फोन नंबरवर फोन करावा व आवश्यक ती माहिती देऊन त्यांच्याकडून ऑड नंबर घ्यावा. तसेच त्या विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती पूर्वी दिलेल्या मॅन्युअल फॉर्मच्या नमुन्यात esfc@unishivaji.ac.in या मेल आयडीवर मेल करावी. अशी माहिती न पाठविल्यास त्या विद्यार्थ्याचा निकाल जाहीर करण्यात अडचणी येतील व असे निकाल जाहीर करण्यास विलंब होण्याची शक्यता असते.

- ***ऑक्टोबर-२०१४ मध्ये झालेल्या परीक्षेमधील ज्या ऑड नंबरच्या विद्यार्थ्यांचे निकाल अद्यापि जाहीर झालेले नाहीत अशा विद्यार्थ्यांच्या गुणांचे संकलन संबंधित परीक्षा विभागातून करून ते त्या त्या विद्यार्थ्यांच्या निकालात घेण्याचे काम सुरू आहे. बहुतांश विद्यार्थ्यांचे निकाल सुधारित करण्यातही आले आहेत. तथापि गुण न कळण्याच्या अपवादात्मक शक्यतेनुसार या विद्यार्थ्यांपैकी जर विद्यार्थी दिनांक ३० मार्च २०१५ पासून सुरू होणा-या परीक्षेस बसू शकला नाही तर त्यांना खेळाडू विद्यार्थ्यांसाठी होणा-या परीक्षेवेळी बसण्याची सुविधा देण्यात येईल. तरी या विद्यार्थ्यांनी अस्वस्थ न होता आपली माहिती परीक्षा शुल्कासह परीक्षा विभागास वेळेत कळवावी.***

तरी विद्यार्थी व महाविद्यालयांनी वरील व्यवस्थेची नोंद घेऊन परीक्षा सुरळितपणे पार पाडण्यास सहकार्य करावे ही विनंती.

- बी.ए. सेम- १ व ६ ऑड नंबरसाठी ०२३१ २६०९११६
- बी.कॉम सेम-१ व ६ ऑड नंबरसाठी ०२३१ २६०९११७

आपला विश्वासू
सही/-
परीक्षा नियत्रक
(महेश काकडे)

प्रत : सर्व परीक्षा विभागप्रमुख यांना माहितीसाठी

C:\Users\acer\Desktop\ODD NO. CIRCULAR NO.2.doc/mahadeshwar/